**CNR NO MHWR030021322026**

स.फौ.ख.क्र. १२१०/२०२६

शासन विरूध्द क्षितीज नरांजे

निशाणी क्रमांक .......

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (फौजदारी न्यायालय क्र. १), वर्धा यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : विक्रांत प्र. खंदारे)

**गुन्हयाचा तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १. अपराधाचा दिनांक | : | ०७/०३/२०२६ |
| २. फिर्याद दाखल दिनांक | : | ०८/०३/२०२६ |
| ३. फिर्यादीचे नाव | : | सरकारतर्फे पो.स्टे. अधिकारी,<br>वर्धा पोलीस स्टेशन, जि. वर्धा. |
| ४. आरोपीचे नाव | : | क्षितीज पुरूषोत्तम नरांजे,<br>वय २९ वर्षे, धंदा : मजुरी<br>रा. सिंदी मेघे, वर्धा जि. वर्धा. |
| ५. कायदयाचे नाव व कलम | : | भारतीय न्याय संहितेचे कलम २८७ प्रमाणे. |
| ६. गुन्हयाचा तपशील | : | |

दिनांक ०७/०३/२०२६ रोजी रात्री ०८:४० वाजताच्या सुमारास मौजा पोस्ट ऑफिस चौक, वर्धा, जि. वर्धा येथे जाणा—या येणा—या पादचा—यांच्या जिवीतास धोका निर्माण होईल हे माहित असुन सुध्दा निष्काळजीपणाने रस्त्याच्या बाजुला तुमच्या ताब्यातील हातगाडीवर ज्वालाग्रही गॅस शेगडी व सिलेंडरचा वापर करीत असतांना मिळून आले. त्यामुळे तुम्ही माझे अखत्यारीत भारतीय न्याय संहितेचे कलम २८७ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

करीता तुमचेविरूध्द या न्यायालयात खटला चालविण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.03.30 17:20:18 +0530

दिनांक : ३०/३/२०२६
ठिकाण : वर्धा.

(वि. प्र. खंदारे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

७. **आरोपीचे प्रतिवेदन**

प्रश्न क्र. १ : तुम्हाला सदर खटल्यामधील चालानाच्या नकला मिळाल्या का ?

उत्तर : होय.

प्रश्न क्र. २ : तुम्हाला वाचून व समजावून सांगितलेला गुन्हयाचा तपशिल समजला काय ?

उत्तर : होय.

प्रश्न क्र. ३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर : होय.

प्रश्न क्र. ४ : आता समजाविल्याप्रमाणे तुम्हाला गुन्हा कबूल केल्यास दंड होवू शकतो हे समजले काय ?

उत्तर : होय.

प्रश्न क्र. ५ : तुम्हाला तरीही गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर : होय.

आरोपीची सही | माझे समक्ष

———————

दिनांक : ३०/३/२०२६ | (वि. प्र. खंदारे)
ठिकाण : वर्धा. | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

**आदेश**

८. आरोपीविरूध्द गुन्हयाचा तपशिल ठेवतांना व त्याचे प्रतिकथन नोंदवितांना आरोपीने त्याला सदर गुन्हे कबुल असल्याचे निवेदन नोंदविले आहे. त्याबाबत त्याने पुरसिस सुध्दा दाखल केलेली आहे. आरोपी स्वमर्जीने व कोणत्याही दडपणाखाली न येता गुन्हा कबुल करीत असल्याची खात्री करून त्याचे गुन्हा कबुलीचे प्रतिकथन मान्य करण्यात येते. त्यानुसार आरोपीला सदर गुन्हयांकरीता दोषी ठरविण्यात येते.

९. विद्वान सहाय्यक सरकारी वकील, आरोपी व त्याचे विद्वान वकिल यांचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले. आरोपीने निवेदन केले आहे की, तो घरामध्ये एकटाच कमावता असून कुटूंबाची सर्वस्व जबाबदारी त्याच्यावर आहे. तसेच तो हलाखीचे जीवन जगत असून त्याला रोजगाराची आबाळ आहे. करीता त्याने कमीत कमी दंड आकारण्याची विनंती केली.

१०. आरोपीविरूध्द सिध्द गुन्हा साध्या स्वरूपाचा असून हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे. परंतु असे असुनही सार्वजनिक रस्त्यावर निष्काळजीपणाने हातगाडीवर ज्वालाग्रही गॅस सिलेंडरचा वापर करणे व शासकिय आदेशाचे अवंद करणे हे गंभिर कृत्य आहे. तसेच त्यामुळे अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही. अशावेळी आरोपीला शिक्षा न केल्यास त्याला या बाबीची जाणीव राहणार नाही व तो अशाच घटनांची पुनरावृत्ती करू शकतो. त्यामुळे आरोपीला शिक्षा देणे क्रमप्राप्त ठरते. करीता, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी क्षितीज पुरूषोत्तम नरांजे यास भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये भारतीय न्याय संहितेचे कलम २८७ या शिक्षापात्र गुन्हयांसाठी दोषी ठरविण्यात येवून त्याकरीता त्यास रूपये ५००/— द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. आरोपीने दंड रक्कम न भरल्यास ०१ दिवसाचा साधा कारावास भोगावा.

२. या आदेशाची एक प्रत आरोपीला विनामुल्य देण्यात यावी.

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.03.30 17:20:09 +0530

दिनांक : ३०/०३/२०२६ | (वि. प्र. खंदारे)
ठिकाण : वर्धा. | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

प्रत विनामुल्य मिळाली
(आरोपीची सही) ..................